# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबई विद्यापीठाच्या एमएससी परिक्षेत गैरप्रकार झाल्याबाबत**

**(१) १८३ (०६-०४-२०२०). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.यशवंत माने (मोहोळ), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.शिरीष चौधरी (रावेर), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापिठामार्फत एमएससी भौतिकशास्त्र सत्र तीनमधील स्टॅटिस्टिकल मेकॅनिक्स या विषयाची परिक्षा दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निश्चित करण्यांत आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना जुन्या अभ्यासक्रमाच्या पेपर कोडच्या प्रश्नपत्रिका नवीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना तर जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना नवीन पेपर कोडच्या प्रश्नपत्रिका देण्यात आल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांनी विद्यापिठाकडे त्याचदिवशी तक्रारी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना न्याय देण्याऐवजी विद्यापिठाच्या परिक्षा व मुल्यमापन मंडळाने विद्यार्थ्यांची दिनांक १४ जानेवारी, २०२० रोजी पुन्हा परिक्षा घेण्यात येणार असल्याचा निर्णय मंडळाच्या दिनांक २६ डिसेंबर, २०१९ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, विद्यापिठाच्या सदर निर्णयास विरोध दर्शवून "यापूर्वी झालेल्या आणि पुन्हा नव्याने घेण्यात येणाऱ्या परिक्षेपैंकी ज्या परिक्षेत जास्त गुण असतील ते ग्राहय धरण्यात येतील "असा परिक्षा मुल्यमापन मंडळाने यापूर्वीच निर्णय घेतला असताना त्याऐवजी आता घेण्यात आलेला निर्णय हा विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा असल्याने त्या निर्णयाचा फेरविचार करावा अशी मागणी सिनेट सदस्यांनी विद्यापिठाकडे केली आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त निर्णयाचा फेरविचार करण्यात आला आहे काय व त्याबाबत फेरविचाराअंती कोणता निर्णय घेण्यात आला आहे तसेच अभ्यासक्रमाबाहेरील प्रश्न टाकणाऱ्या परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या संबंधित दोषी विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) हे अंशतः खरे आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.२६ डिसेंबर, २०१९ च्या बैठकीमध्ये एमएससी (सत्र ३) (स्टॅटिस्टिकल मेकॅनिक्स) (R-२०१८-१९) या विषयासाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा नव्याने घेण्यात यावी. तसेच चर्चेदरम्यान निदर्शनास आल्यामुळे एमएससी (सत्र ३) (स्टॅटिस्टिकल मेकॅनिक्स) या जुन्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा पुन्हा नव्याने परीक्षा घेण्यात यावी. यात विद्यार्थ्यांना दि.१३ डिसेंबर, २०१९ रोजी झालेल्या व नव्याने घेण्यात येणाऱ्या परीक्षेपैकी ज्या परीक्षेत जास्त गुण असतील ते ग्राह्य धरण्यात यावेत, असा ठराव पारीत करण्यात आला आहे.

(५) सदर विषयाच्या परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही याची पूर्ण दक्षता विद्यापीठाने घेतली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील रुग्णांच्या आहारसेवा निविदा प्रकरणी शासनाचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत**

**(२) १३५५ (१३-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयांमध्ये कंत्राटी आहारसेवा पुरविण्याकरीता व आहार सेवेत सुसुत्रता यावी म्हणून दिनांक १३ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये आहारासाठी प्रतिरुग्ण रुपये ७० प्रतिदिवस खर्च गृहीत धरुन ई निविदा काढण्यास शासनाने प्रशासकीय मंजूरी दिलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असताना सहसंचालक, आरोग्यसेवा यांनी सदरचा शासन निर्णय न जुमानता वाढीव दराने म्हणजे प्रतिरुग्ण १२६ रुपयांप्रमाणे आहारसेवा पुरविण्याचे व त्यामध्ये विदर्भातील संस्थांना अपात्र ठरवून नवी मुंबईच्या वाशी येथील कंपनीला आहार सेवेचे नियमबाहय कंत्राट दिल्याचे दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रकरणी शासनाचे २४ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्याने व विदर्भातील अनेक संस्थांनी निविदा अनावश्यक कागदपत्रे सादर करण्याचे सांगत या संस्थांना अपात्र ठरविल्याप्रकरणी शासनाने लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत (एसीबी) मार्फत चौकशी करण्याची मागणी वर्ध्यातील विदर्भ युवक स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्थेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, त्यानुसार सर्व संबंधिताविरुध्द शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२१-०१-२०२२) :** (१)होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

यापूर्वी उद्योग उर्जा विभागाच्या दि. ०१.१२.२०१६ रोजीचा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या अगोदर सेवेसाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात येत नसल्याने निविदा निश्चित झाल्यावर त्यास उपसंचालक स्तरावरुन मंजूरी घेण्यात येत होती.त्यामुळे दराबाबत तफावत येत नव्हती.मात्र दि. ०१.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णय आल्यानंतर प्रशासकिय मान्यता अगोदर घेण्यात येत असल्याने प्रशासकिय मान्यता दर व निविदेनंतरचे दर त्यामध्ये तफावत दिसून येते.तसेच विदर्भातील संस्थांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे ते सदर निविदेसाठी अपात्र ठरले होते.तसेच नवी मुंबईच्या वाशी येथील कंपनीला आहार सेवेचे कंत्राट दिल्याची बातमी दि. १३ डिसेंबर, २०१९ रोजीच्या वृत्तपत्रात छापून आली होती.

(३) हे खरे नाही.

निविदेसाठीची कागदपत्रे सादर करण्याबाबतचा नियम सर्व संस्थांसाठी एकसारखाच असल्यामुळे विदर्भातील संस्थांकडून कोणतीही अनावश्यक कागदपत्रे मागविण्यात आली नव्हती.विदर्भ युवक स्वयंरोजगार सेव सहकारी संस्थेकडून सदर आशयाची बातमी दि. १३.१२.२०१९ रोजीच्या लोकमत वृत्तपत्रात देण्यात आली होती.त्यावर सन २०१९ च्या हिवाळी आधीवेशन कालावधीत स्पष्टीकरण देण्यात आले होते.

(४), (५) आणि (६) प्रश्न उदभवत नाही.

---

## आसोली, भंडारा रोड (नागपूर) येथील के.जॉन पब्लिक स्कूल या शाळेविरुध्द कारवाई करण्याबाबत

**(३) १८९९ (०९-०४-२०२०). श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील सर्व शाळांना महालक्ष्मीपूजना निमित्त दिनांक ६ सप्टेंबर, २०१९ रोजी सुटी जाहीर केली असताना के.जॉन पब्लिक स्कूल, आसोली, भंडारा रोड, नागपूर ही शाळा सुरु ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच दिवशी नागपूर शहर व ग्रामीण भागात आलेल्या पावसामुळे सदर शाळेच्या परिसरात पाणी शिरल्यामुळे अनेक विद्यार्थी अडकले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, नागपूर यांना माहे सप्टेबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शाळा प्रशासनावर कारवाई करण्याबाबत निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०६-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रस्तुत शाळेची चौकशी करण्यासाठी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ मधील नियम १२ (ख) नुसार तपासणी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने आर.टी.ई. अंतर्गत प्रत्यक्ष दि.०५/०३/२०२० रोजी प्रत्यक्ष तपासणी केली असून त्याबाबत चौकशी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सदर शाळा आर.टी.ई. चे निकष पूर्ण करीत असल्याचे चौकशी अहवालात नमूद आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समग्र शिक्षा अभियानांतर्गत शाळांच्या पात्र संख्येनुसार अनुदान देण्याबाबत

**(४) ४०२४ (०८-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने गत वर्षापासून समग्र शिक्षा अभियानांतर्गत शाळांच्या पटसंख्येनुसार अनुदान देण्यास सुरवात केली आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच, शासनाच्या नवीन आदेशानुसार ३० पेक्षा कमी पट असणाऱ्या शाळांना ५ हजार रुपये अनुदान देण्यात येते तसेच शंभर पेक्षा कमी पट असलेल्या शाळांना १० हजार अनुदान देण्यात आले, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर्षी या अनुदानात कपात करण्यात आली असून तसेच नवीन आदेशामुळे शिक्षकांना शाळा चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२५-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
संयुक्त शाळा अनुदान (Composite School Grant) विद्यार्थी संख्येच्या आधारावर देण्यात येते.
(२) होय.

केंद्र शासनाकडून मंजूर पेक्षा कमी अनुदान प्राप्त होत असल्यामुळे उपलब्धतेप्रमाणे अनुदान दिले जाते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(५) ४०२८ (०९-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस), श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सरसकट २० टक्के अनुदान प्राप्त शाळेतील शिक्षकांचे नियमित वेतन माहे सप्टेंबर, २०१९ पासून अनुदानाअभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण संचालकांकडे अनुदानाची मागणी केली असता, कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, २१ शाळांमधील १०० शिक्षक मागील आठ ते दहा वर्षापासून विना वेतन काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय वा चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त थकीत अनुदान त्वरित वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

शिक्षण संचालनालयाचे अनुदान वितरण आदेश क्र.माध्य-ब /२०१९-२०/अनुदान ३०९/८१७६/दि. २.१२.२०१९ अन्वये प्राप्त अनुदान आणि मागणी यांच्या प्रमाणात वितरीत करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वडशिंगे ते कदम वस्ती व रेल्वे स्टेशन या रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्याबाबत

**(६) ४४३९ (१६-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून वडशिंगे ते कदम वस्ती व रेल्वे स्टेशन या रस्त्याचे काम २५१५, जिल्हा परिषद सेस फंड, व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजूर आहे, परंतु रस्ता एकीकडे व काम दुसरीकडे हे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच रस्त्याच्या कामासाठी ३ विभागाकडून मंजुरी मिळाली असता २५१५ मधून ३० लाखांचे कामाचे बिल निघाले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने संबंधित विभागाच्या दोषी अधिकाऱ्यांवर व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१५-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) लेखाशीर्ष २५१५ १२३८ अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये मान्यता मिळाल्यानुसार रु. ३.०० लक्ष रक्कमेचे वडशिंगे ते वडशिंगे रेल्वे स्टेशन या रस्त्याचे Pick and Roll (सा.क्र. ०/०० ते ०/५७७ कि. मी. ) चे काम करण्यात आले आहे. सदर कामाचे रु. २,९८,७७४/- देयक कंत्राटदारास अदा करण्यात आले आहे. त्यामुळे लेखाशीर्ष २५१५ १२३८ या योजनेतून रु. ३०.०० लाख इतक्या रक्कमेचे देयक निघाले हे खरे नाही.

जिल्हा सेस फंडातून वडशिंगे रेल्वे स्टेशन ते कदम वस्ती पाणंद रस्ता करणे रक्कम रु. ०.६० लक्ष हे योजनाबाह्य रस्त्याचे काम मंजूर असून अद्याप सुरू नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुस्ते (ता.पंढरपुर, जि. सोलापूर) येथील रेडिमेड शौचालय पुरवठा धारकांची देयके थकीत असल्याबाबत**

**(७) ४४६२ (१६-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुस्ते (ता.पंढरपुर,जि. सोलापूर) येथील रेडिमेड शौचालय पुरवठा धारकांची ४ कोटी ४ लाख ५२ हजार रुपयांची देयके मागील ३ महिन्यांपासून थकीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ मध्ये शौचालय बांधकाम ठेकेदाराची बैठक घेतली असून याला प्रतिसाद देत येथील पुरवठा धारकांनी पैसे व्याजाने काढून लाभार्थ्यांना शौचालय उपलब्ध करून दिले परंतु अद्याप जिल्हा परिषदेकडून देयके काढण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषद, संबंधित ग्रामपंचायत लाभार्थ्यांकडे पाठपुरावा करूनही बिले मिळत नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बिले तात्काळ देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०२-१२-२०२१) :** (१) नाही , हे खरे नाही.
जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून कोणत्याही पुरवठाधारकास वैयक्तिक शौचालय बांधकाम करणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही, त्यामुळे संबंधित पुरवठाधारकाची वैयक्तिक शौचालय बांधकाम करणेबाबत कोणतीही देयके जिल्हा परिषद, सोलापूर कडे थकीत नाहीत.

(२) नाही, हे खरे नाही.
वैयक्तिक शौचालय बांधकाम तांत्रिकदृष्ट्या परिपुर्ण होण्यासाठी बैठक घेण्यात आली होती. स्वच्छ भारत मिशन (ग्रामिण) च्या मार्गदर्शक सुचनेनुसार सदरची योजना वैयक्तिक लाभाची योजना असुन वैयक्तिक लाभार्थाच्या बँक खात्यामध्ये प्रोत्साहन अनुदान वितरित केले जाते. त्यामुळे कोणत्याही पुरवठाधारकाचे देयके व बिले प्रलंबित नाहीत.
(३) नाही, हे खरे नाही.
अशा प्रकारे जिल्हा परिषद, सोलापूर कडे कोणत्याही पुरवठाधारकाचे देयके व बिले प्रलंबित नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या उत्तरपत्रिकेत फेरफार केल्याबाबत**

**(८) ५०८९ (०७-०४-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे उपकुलसचिव श्रीमती अर्चना साळुंके यांच्यावर सत्यशोधन कमिटीच्या अहवालामध्ये अवैधरित्या उत्तरपत्रिका हाताळणे व बनावट टिपण्या तयार केल्याप्रकरणी दोषी ठरविण्यात आले असल्याचे दिनांक २४ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ॲड कक्कळमेली यांचा युक्तीवाद ग्राहय धरत सात पैकी सहा आरोप सिद्ध झाले असल्याचा अहवाल विद्यापीठाकडे सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सोलापूर शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर
विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ मृणालिनी फडणवीस यांचे लॉगीन आयडी वापरुन पंधरा विद्यार्थ्यांना गुण वाढवून पास केल्याचे दिनांक २४ डिसेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, परीक्षा नियंत्रक पद रिक्त असताना एम.के.सी.एल पुणे यांच्याकडून स्वतंत्र लॉगिन आयडी तयार करण्यात आला आहे, हे हीखरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणता गुन्हा दाखल करण्यात आला व
कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (२८-०१-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांचे लॉगीन आयडी वापरून काही विद्यार्थ्यांच्या गुणांमध्ये फेरफार केल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.
डॉ. श्रीकांत राजाराम कोकरे हे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर कार्यरत असताना त्यांच्या निर्देशानुसार एम. के. सी. एल. पुणे यांच्याकडून स्वतंत्र लॉगीन आयडी तयार करण्यात आला आहे.
(५) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विद्यापीठाने द्वीसदस्यीय सत्यशोधन समिती गठित केली होती. सदर समितीने दि.१६.१२.२०१९ रोजी अहवाल सादर करुन या प्रकरणी पुढील चौकशीकरिता पोलिस फिर्याद नोंदविण्याची शिफारस केली होती. त्यानुषंगाने विद्यापीठ प्रशासनाने दि.२५ डिसेंबर, २०१९ रोजी फौजदार चावडी पोलिस ठाणे, सोलापूर येथे अज्ञात आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये प्रथमदर्शनी सक्रिय सहभाग असलेला एकूण चार व्यक्तींना दि.१९.०१.२०२१ रोजी अटक करण्यात आली. तद्नंतर सदर प्रकरणी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

---

**मुंबईतील दादर, परळ, माटुंगा विभागातील अनेक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना भविष्यनिर्वाह निधीचे विवरण मिळत नसल्याबाबत**

**(९) ६२४३ (१०-०४-२०२०). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादर, परळ, माटुंगा विभागातील अनेक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या दरमहा वेतनातून भविष्य निर्वाह निधीची रक्कम वजा केली जात असतानाही संबंधित शिक्षकांना सन २०१४ ते २०२० पर्यंतच्या कालावधीची भविष्य निर्वाह निधी बाबतची माहिती दिली जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भविष्य निर्वाह निधीमध्ये दरवर्षी जमा झालेली रक्कम व्याजासह प्रत्येक कर्मचा-यांना भविष्य निर्वाह निधीच्या कपाती संदर्भातील विवरण कळविणे आवश्यक असताना दक्षिण-मध्य मुंबई शिक्षण निरिक्षक कार्यालयाने सन २०१४ ते २०२० या कालावधीतील कोणताही तपशील दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, वा त्यात काय आढळून व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे आय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (२१-०१-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.
मुंबईतील दादर, परळ, माटुंगा विभागातील काही मोजक्या शाळांव्यतिरिक्त बाकी सर्व शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सन २०१९-२० पर्यंतचे भविष्य निर्वाह निधीच्या कपातीचे विवरण पत्र वाटप करण्यात आलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात 'क्लिनिकल एस्टाब्लीशमेंट लॅबोरेटरी ॲक्ट' लागू करण्याबाबत.**

**(१०) ११४१४ (१०-०८-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे आठ हजार बेकायदेशिरपणे पॅथलॅब सुरु असून या पॅथलॅबकडून रुग्णांची फसवणूक होत असल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशिरपणे सुरु असलेल्या पॅथलॅबना आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने तयार केलेला 'क्लिनिकल एस्टाब्लीशमेंट लॅबोरेटरी ॲक्ट' राज्यात लागू करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात बेकायदेशिरपणे सुरु असलेल्या पॅथलॅबवर आळा घालण्यासाठी सदर कायद्याची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२४-०१-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत.

(२) क्लिनिकल एस्टाब्लीशमेंट लॅबोरेटरी ॲक्ट राज्यात लागू झालेला नाही.

(३) बोगस वैद्यकिय व्यवसायीकांवर आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय दि. ०७.०२.२००० अन्वये जिल्हास्तरीय पुर्नविलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहरातील आच्छाड सीमा तपासणी नाक्यावरुन गुजरात व राजस्थानातील खाजगी प्रवासी वाहतुकीला छुप्या मार्गाने प्रवेश दिल्याबाबत**

**(११) १४३६८ (१६-०९-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये कोव्हिड-१९च्या प्रादुर्भावामुळे प्रवासी वाहतूक बंद असताना गुजरात व राजस्थान येथून अवैधरित्या ठाणे शहरातील आच्छाड सीमा तपासणी नाक्यावरुन खाजगी प्रवासी वाहतुक होत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खाजगी वाहतूकदारांनी नियमांचे उल्लंघन केले असतानाही परिवहन विभागाने याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार बेजबाबदार वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. अनिल परब (०७-०४-२०२१) :** (१), (२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे या कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत दि.२०.०६.२०२० रोजी ई-पास नसणा-या व सामाजिक अंतराचे पालन न करता प्रवास करणा-या एकुण आठ वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रकरणी परिवहन आयुक्त यांनी नियुक्त केलेल्या चौकशी अधिकारी (प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर (शहर) यांनी सादर केलेल्या अहवालानूसार मोटार वाहन विभागातील अधिका-यांनी हेतूपुरस्कर दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

अवैध प्रवासी वाहतुकीसंदर्भात कारवाई करण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाकडून संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईच्या स्वच्छ हवेसाठी आखण्यात आलेल्या 'स्वच्छ हवा कृती आराखडा' मध्ये उपाययोजनांची अंमलबजावणी करणेबाबत

**(१२) १४३७४ (१६-०९-२०२०). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खाजगी संस्थांनी सादर केलेल्या अहवालानुसार मुंबईच्या स्वच्छ हवेसाठी आखण्यात आलेल्या 'स्वच्छ हवा कृती आराखडा' मध्ये उपाययोजनांची अंमलबजावणी विविध संस्थांतर्गत करण्यात येत असल्याने यात अनेक अडथळे निर्माण होत असल्याची बाब माहे जुलै, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंमलबजावणी संदर्भात कोणतीही कायदेशीर तरतूद या आराखड्यात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरातील वायू प्रदूषण नियंत्रणात आणण्याकरिता शासनाकडून जबाबदारीचे विभाजन करून वायु प्रदूषण नियंत्रणाची नोंद करण्यासाठी नियमावली तयार करण्यात येणार आहे काय, असल्यास, त्याचे स्वरूप काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नीरी, आय.आय.टी. मुंबई यांच्यासमवेत संबंधित शहरातील भागधारकांसोबत वेळोवेळी बैठका घेऊन, हवा प्रदूषण नियंत्रणाकरिता सर्व समावेशक कृती आराखडा तयार केला आहे. त्यामध्ये परिसरातील कारखाने, विविध शासकिय विभाग व संस्था हे भागधारक आहेत. सदर कृती आराखडयामध्ये विविध शासकिय विभाग व संस्था परिसरातील कारखाने हयांनी उपाययोजना व त्यांबाबत जबाबदारीचे विभाजन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोरेगाव (प.) येथील विद्यामंदिर ही शाळा बंद केल्याबाबत.**

**(१३) १४५४९ (०४-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (पश्चिम) मुंबई येथील विद्यामंदिर ही शाळा धोकादायक आणि मोडकळीस आल्याच्या नावाखाली बंद करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शाळेत १ ली ते १० वी पर्यंत ३५० मुले शिक्षण घेत असून त्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळा बंद करण्यास पालक व विद्यार्थ्यांचा विरोध आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू शाळा सुरू ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-०३-२०२१) :** (१), (२) व (३) सदर शाळा धोकादायक असल्याची नोटिस बृहन्मुंबई महानगरपालिकेने संबंधित शाळा व्यवस्थापनाला दिली असल्याने शाळा व्यवस्थापनाने पालक संघटनाची सभा घेऊन शाळेत शिकणाऱ्या २९ मुलांचे पालकांच्या संमतीने अन्य नजिकच्या महापालिका / मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेत प्रवेश घेऊन शाळा बंद केली आहे. त्यामुळे सदर शाळेत शिकणाऱ्या मुलांचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**मुंबई विद्यापीठाच्या निकषात बसत नसतानाही प्राचार्यांची केलेली नियुक्ती**

**(१४) १४५५३ (०४-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या निकषात बसत नसतानाही नियुक्त केलेल्या प्राचार्यांनी ३० वर्षांहून अधिक काळ सेवा बजावल्याची माहिती माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सदंर्भात चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानंतर नियुक्ती रद्द करण्यात आली असून प्राचार्यांना एवढ्या वर्षांचे वेतन व अन्य लाभांसाठीची मिळालेली दीड कोटीहून अधिकची रक्कम परत करावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनान चौकशी केली आहे काय असल्यास चौकशीत काय अढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उदय सामंत (०६-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिसरमध्ये अनधिकृतरित्या तिवरांची कत्तल होत असल्याबाबत**

**(१५) १४५५५ (०२-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दहिसरच्या प्रभाग क्र.२ मधील सरस्वती कॉम्प्लेक्स येथे विकासकाने कांदळवन क्षेत्राच्या ५० मीटरच्या आत तिवरांची कत्तल करून, तिवरे जाळून रस्ता तयार करण्यासाठी अनधिकृतपणे भराव टाकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दहिसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (२२-०७-२०२१) :** (१) व (२) निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार हे अंशत: खरे आहे.

(३) मौजे दहिसर पूर्व येथील स.न.३४०/२ या मिळकतीवर कांदळवनाच्या झाडाजवळ भरणी झाल्याचे आढळून आल्याने दहिसर पोलिस ठाणे येथे अज्ञात इसमाविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ (१) (२) अन्वये दिनांक १७.११.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील शाळांच्या आवारामध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे विक्री होत असल्याबाबत**

**(१६) १४७०१ (०४-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक शाळांच्या आवारामध्ये तंबाखूजन्य पदार्थासह अंमली पदार्थांचीही विक्री राजरोसपणे सुरू असल्याची माहिती माहे, एप्रिल २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या आवारामध्ये १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विकू नये असे राज्य शासनाचे कडक निर्देश आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (०७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील प्रदूषित झालेल्या नद्यांबाबत

**(१७) १४८१४ (१७-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय हरित लवादाने (एनजीटी) दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्रात प्रदूषित नद्यांची संख्या सर्वाधिक असल्याने घनकचरा व्यवस्थापनाच्या नियमांचे पालन करण्याबाबतचा अहवाल दर चार महिन्यांनी सादर करण्याचे आदेश मुख्य सचिवांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ३० जिल्ह्यांतील पाण्याचे नमुने देखील दूषित आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (०६-०९-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मा. हरित लवाद यांनी दि. ०६/१२/२०१९ च्या आदेशान्वये नद्या प्रदूषण मुक्त करण्यासाठीचा राष्ट्रीय आराखडा तयार करणे व त्यांच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी केंद्रीय देखरेख समितीचे गठन सचिव जलशक्ति मंत्रालय, भारत सरकार यांच्या अध्यक्षतेने करण्यात आले होते.

आज पर्यंत सदर समितीच्या नऊ बैठका झाल्या आहेत. सदर बैठकीत प्रदूषित नदी पुनरूज्जीवनासाठी सादर करण्यात आलेल्या कृती आराखडयांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीचा दर तीन महिन्यांनी आढावा घेतला जातो. ज्या मध्ये प्रामुख्याने नागरी भागातून तयार होणाऱ्या सांडपाण्यावर केली जाणारी प्रक्रीया, औद्योगिक प्रदूषण नियंत्रण, घन कचरा तसेच अन्य कचऱ्याचे व्यवस्थापन इत्यादी विषयांचा आढावा घेतला जातो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अन्न व औषध प्रशासन विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

**(१८) २७२०५ (११-०६-२०२१). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीच्या काळात औषधांचा काळाबाजार सुरू असताना अन्न व औषध प्रशासन विभागातील एकुण १३६१ मंजूर पदांपैकी ५८५ पदे ही अद्याप भरण्यात आली नसल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच अन्न व औषध प्रशासन विभागातील सर्व सह आयुक्तांची पदे रिक्त असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (३०-११-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) अन्न व औषध प्रशासनातील सह आयुक्त संवर्गात १८ पदे मंजुर असुन, त्यातील ०९ पदे भरलेली असुन, ०९ पदे रिक्त आहेत.
(३) अन्न व औषध प्रशासनातील सह आयुक्त संवर्गातील सर्व रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरात खाजगी रुग्णालयांकडून कोरोना संसर्ग झालेल्या रुग्णांना जादा दराने बिले आकारली असल्याबाबत**

**(१९) २७२४८ (१५-०६-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना संसर्ग झालेल्या रुग्णांकडून उपचारासाठी शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने बिले आकारण्याचा प्रकार पुणे शहरातील खाजगी रुग्णालयांकडून सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२० ते मे, २०२१ या कालावधीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरातील भारती हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल, कोथरूड व डेक्कन, के.ई.एम, रुबी हॉस्पिटलसह मोठ्या खाजगी रुग्णालयांत रुग्णांकडून देयकापोटी जादा रक्कम वसूल केली जात असल्याच्या व नियमित दरापेक्षा जादा दराने औषधे विक्री करत असल्याबाबत अनेक तक्रारी महापालिका प्रशासनाकडे आल्या असून जादा देयके रुग्णांकडून वसूल केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुण्यातील खाजगी रुगणालयांनी वसूल केलेल्या देयकांचे ऑडीट करुन जादा आकारण्यात आलेल्या देयकांची सर्वसामान्यांना परतफेड करावी अशी मागणी माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा दरम्यान मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(५) असल्यास, कोरोना रुग्णांना उपचाराकरीता खाजगी रुग्णालयांकडून जादा दराने आकारणी करण्यात येणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई करणेसह जादा देयके आकारण्यात आलेल्या रुग्णांना देयकांच्या रक्कमेची परतफेड करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.
काही रुग्णालयांच्या बिलांसंदर्भात असे आढळून आले आहे.
(२) होय हे अंशत: खरे आहे.
मोठया खाजगी रुग्णालयात रुग्णाकडून बिलापोटी जादा रक्कम वसुल केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त आहेत.
तथापि नियमित दरापेक्षा जादा दराने औषध विक्री करत असलेची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) खाजगी रुग्णालयात रुग्णाकडून बिलापोटी जादा रक्कम वसुल केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त आहेत तथापि विशिष्ट तक्रार माहे डिसेंबर वा दरम्यान प्राप्त झालेली नाही.

परंतू पुणे महानगरपालिकेमार्फत दिनांक १४ ऑगस्ट २०२० पासून कोवीड-१९ उपचाराची बिले तपासणी करणेची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रत्यक्ष खाजगी रुग्ण दाखल असतांना व डिस्चार्जचेवेळी बील तपासणी करणेसाठी प्री ऑडिटसाठी मोठ्या रुग्णालयांत ऑडिटर्सची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार बील तपासणीचे प्री ऑडिट कामकाज करणेत येत आहे. त्यानुसार बहुतांश प्रकरणात खाजगी रुग्णालयांना जादा आकारणी झालेली रक्कम संबंधीत रुग्ण वा त्यांचे नातेवाईक यांना परत कारणेबाबत कार्यवाही केलेली आहे व करण्यात येत आहे.

तसेच रुग्णास जादा आकारणी केलेल्या काही रुग्णांच्या बीलांचा परतावा देणेस टाळाटाळ करणा-या सह्याद्री हॉस्पीटल्स ग्रुप, पुणे च्या विविध रुग्णालयांना नोटीसा
बजावण्यात आलेल्या आहेत.

अद्याप पर्यंत एकुण प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार ज्यादा आकारणी झालेली रक्कम रुग्णांचे नावे परत करण्यात आली आहेत.

प्री ऑडिट- एकुण १४७९ बीला पैकी १०९८ बीलांमधुन पुढील प्रमाणे रक्कम कमी करण्यात आली आहेत-

- एकूण बीलांची रक्कम- २७,५१,६१,२३१/-
- बीलांची ऑडिट नंतरची रक्कम - २२,५३,३२,६२४/-
- ऑडिट नंतर कमी झालेली एकूण रक्कम- ४,९८,२८,६०७/-

पोस्ट ऑडिट- (प्राप्त झालेल्या तक्रारी) ६७ रुग्ण अथवा त्यांचे नातेवाईक यांना पुढील प्रमाणे परतावा मिळाला आहे-

- रुग्णालयाने आकारलेले बील - २,२८,४६,९९९/
- अधिसूचनंतील ॲनेक्सर सी प्रमाणे होणारी रक्कम- १,८५,२६,६६२/
- रुग्णालयाकडून संबधीत रुग्णांस परत करण्यात आलेली रक्कम- ४१,९३,९०४

(६) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) निम्न तेरणा प्रकल्पासाठी अतिरिक्त भूसंपादन करणेबाबत

**(२०) २७८७९ (१५-०६-२०२१). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माकणी (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) येथील निम्न तेरणा प्रकल्पासाठी संपादित न केलेल्या प्रकल्पाशेजारील शेतकऱ्यांच्या जमिनीत प्रकल्पातील पाणी शिरून पाणी तुंबत असल्याच्या तक्रारी प्राप्त असून त्याबाबत सर्वेक्षण करून अतिरिक्त भूसंपादन प्रस्ताव सादर

करण्याबाबत व सदर भूसंपादनाची तातडीने कार्यवाही करण्याची मागणी औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.पालकमंत्री, लातूर यांच्याकडे दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी निम्न तेरणा प्रकल्प माकणी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, सदरील मागणीच्या व शेतकऱ्यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अतिरिक्त भूसंपादन प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मा.पालकमंत्री, लातूर यांनी अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण लातूर व कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र.१ यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे सर्वेक्षण शासनाने केले आहे काय, सर्वेक्षणामध्ये काय आढळून आले, त्यानुसार अतिरिक्त भूसंपादन करण्याचा प्रस्ताव सादर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२१-१०-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) दि.२५.०६.२०२१ रोजी लातूर येथे झालेल्या बैठकीत प्रकल्पाच्या जलाशयातील बुडित क्षेत्राचे फेर सर्वेक्षण करण्याच्या सूचना सबंधीत अधिकाऱ्यांना क्षेत्रीय स्तरावर देण्यात आल्या आहेत. त्यानुसार लातूर पाटबंधारे विभाग क्रमांक १, लातूर यांचेमार्फत सर्वेक्षणाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास सक्षम स्तरावर मान्यता देण्यात आली आहे.

सद्यस्थितीत सर्वेक्षणासाठी निविदा प्रसिद्ध करण्यात येत असून सर्वेक्षणानंतर, अतिरिक्त भूसंपादन करणे आवश्यक असल्यास, पुढील आवश्यक कार्यवाही करणे नियोजित आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## आरोग्य विभागाच्या भरती प्रक्रियेमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(२१) २९६७० (१५-०६-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या गट क पदाच्या नुकत्याच झालेल्या परीक्षेमधील निवड यादी नुसार भरती प्रक्रियेमध्ये काही उमेदवारांना २०० पैकी १९८ गुण मिळाल्याचे निदर्शनास आले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परीक्षेची काठिण्य पातळी पाहता २०० पैकी १९८ गुण मिळणे शक्य नसल्याचे मत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) समन्वय समितीच्या सचिवांनी दिनांक २२ एप्रिल २०२१ रोजी वा त्या सुमाराला व्यक्त केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे स्वरूप काय होते, सदरहू चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, चौकशीनुसार यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) होय,हे खरे आहे.
प्राप्त अहवालानुसार, २८ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या परिक्षेतील गुणवत्ता यादी पडताळणी केली असता काही उमेदवारास १९८ गुण मिळाल्याचे निदर्शनास आहे आहे.
(२) या आशयाचे पत्र विभागाला प्राप्त झाले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खरोसा (ता.औसा, जि.लातूर) येथील लेणी परिसराचा विकास करणेबाबत**

**(२२) २९८२२ (११-०६-२०२१). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खरोसा (ता.औसा, जि.लातूर) येथील इ.स. पूर्व सहाव्या शतकातील सुंदर शैल्य गृह जांभळ्या कोरीव दगडावरील कोरलेल्या अतिप्राचीन बौध्द लेणी असलेल्या परिसराचा विकास करण्यासंदर्भातील जिल्हा नियोजन अधिकारी लातूर यांच्या दिनांक २३ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग,निलंगा यांनी खरोसा लेणी या स्थळाचा पर्यटन क्षेत्रामध्ये समावेश करून पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रस्तावास मंजुरी देऊन लेणी परिसराचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. आदित्य ठाकरे (३०-०७-२०२१) :** (१) व (२) खरोसा लेणी या स्थळाचा पर्यटन क्षेत्रामध्ये समावेश करुन पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. टीडीसी-२०११/१२/ प्र. क्र. ८५५/ पर्यटन, दि. १६.०१.२०१२ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करुन यापुर्वीच लातूर जिळा नियोजन समितीच्या दि.१५.०७.२००० रोजीच्या बैठकीमध्ये खरोसा लेणी या ठिकाणास “क” वर्ग पर्यटन स्थहाचा दर्जा देण्यात आला आहे.

खरोसा लेणी येथे विकास कामांसाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०१२-१३ अंतर्गत रु. ६९.०७ लक्ष रकमेचा वाहनतळ, समोपदेशन केंद्र उभारणे, पदपथ तयार करणे, प्रसाधनगृह, कचारा कुंडी, पाणी पुरवठा, वृध्दांसाठी बैठक व्यवस्था इत्यादी कामांना मान्यता देण्यात आली असून सदर कामे पूर्ण झाली आहेत. तसेच जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०१८-१९ अंतर्गत खरोसा शेडोळ रस्ता प्रजिमा-५२ ची सुधारणा करणे या कामासाठी रु. २९.७५ लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन रु.२२.६८ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात '१०८' क्रमांकाची रुग्णवाहिका सेवा सुरु करण्याबाबत

**(२३) ३२२५३ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १०८ क्रमाकांची रुग्णवाहिकांच्या सेवेची मूदत दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास संपूष्टांत आली असून तेव्हापासून मुदतवाढ देऊन ही सेवा सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलडाणा जिल्ह्यात सध्या २३ रुग्णवाहिकांमार्फत (त्यातील ९ अडव्हान्स लाइफ सपोर्टच्या) ही सेवा चालविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यातील नादुरुस्त रुग्णवाहिका, अपुरे डॉक्टर यामुळे वेळेवर ही सेवा उपलब्ध होत नसल्याने अनेक रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका सुरु करण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१९-०१-२०२२) :** (१) होय,हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

बुलडाणा जिल्ह्यात २३ रुग्णवाहिकांमार्फत सेवा दिली जाते.यापैकी ५-ॲडव्हान्स सर्पोटींग रुग्णवाहिका (एएलएस) व १८- बेसीक लाईफ सपोर्टींग रुग्णवाहिका (बीएलएस) रुग्णवाहिकांमार्फत सेवा दिली जाते.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) आणि (५) प्रश्न उदभवत नाही.

---

### अंधेरी (पूर्व) येथील कामगार राज्य विमा महामंडळाचे बंद असलेले रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(२४) ३२३९१ (११-०८-२०२१). श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) एम.आय.डी.सी. येथे असलेले कामगार राज्य विमा महामंडळ रुग्णालयास दि. १७डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीमुळे १५ रुग्णांचा व परिजनांचा मृत्यू झाला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आग लागल्यापासून आजपर्यंत रुग्णालय बंद ठेवण्यात आल्यामुळे कामगार राज्य विमाधारक रुग्णांना कांदिवली व इतर रुग्णालयात वैद्यकीय सेवा घ्यावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरानाच्या वाढत्या प्रादूर्भावाच्या काळात नागरिकांना वैद्यकीय उपचार घेण्याकरिता लांब जावे लागत असल्यामुळे त्यांना व त्यांच्या परिजनांना त्रास सहन करावा लागत असल्यामुळे अंधेरी (पूर्व) येथील कामगार राज्य रुग्णालयाची नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये वैद्यकीय सुविधा सुरु करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे रुग्णालय हे महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत असुन ते मॉडेल रुग्णालय बनविण्याकरिता केंद्र शासनाकडे हस्तांतरीत केले असुन केंद्रशासनामार्फत रुग्णालय उभारण्यास व सुरु करण्यास विलंब होत असल्यामुळे सदरचे रुग्णालय हे महाराष्ट्र शासन पुन्हा आपल्या ताब्यात घेणार आहे काय,
(५) असल्यास, अंधेरी (पूर्व) येथे नव्याने बांधण्यात आलेल्या रुग्णालयाच्या इमारतीमध्ये वैद्यकीय सुविधा सुरु करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राजेश टोपे (२४-०१-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयास दिनांक १७.१२.२०१८ रोजी लागलेल्या आगीत १४ जण मृत्युमुखी, २७ गंभीर व ११८ किरकोळ जखमी झाले आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) शासनाने सन २००८ मध्ये राज्य कामगार विमा योजना रुग्णालय अंधेरी हे आदर्श रुग्णालय म्हणून चालविण्यास राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांना हस्तांतरीत केले आहे. त्यामुळे ते पुन्हा ताब्यात घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) सदर रुग्णालयाच्या इमारतीमध्ये वैद्यकीय सुविधा सुरु करण्याकरीता दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम मार्च, २०२२ पर्यंत पुर्ण होण्याची शक्यता आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेट्रोल डिझेलला जीएसटी कक्षेत समाविष्ट करण्याकरिता केंद्र सरकारकडे मागणी करुन कार्यवाही करण्याबाबत**

**(२५) ३२४५९ (०५-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेट्रोल डिझेलच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ झाल्याच्या विरोधात राज्यात विविध राजकीय पक्षांनी राज्यभर तीव्र आंदोलने व निदर्शने केल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान घडली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पेट्रोल डिझेलच्या वाढत्या किंमतीमुळे जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीत प्रचंड वाढ झाल्याने संतप्त नागरीकांनी केलेल्या मागणीनुसार राज्यांनी पेट्रोल-डिझेलच्या किंमती कमी करण्याकरिता पेट्रोल डिझेल जीएसटीच्या कक्षेत आणण्याची मागणी राज्य सरकारांने केंद्र सरकारकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाची मागणी मान्य करण्याच्या दृष्टीने अद्याप केंद्र सरकारने याबाबत कार्यवाही करुन कोणता निर्णय घेतला आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (३१-०१-२०२२) :** (१) होय, काही ठिकाणी निदर्शनाच्या घटना घडल्या आहेत.
(२) पेट्रोल व डिझेल यावर राज्य शासनास मिळणारी महसुलाची रक्कम (२५,००० ते २८,००० कोटी) मोठी आहे. जर पेट्रोल व डिझेल या दोन्ही गोष्टींचा GST मध्ये अंतर्भाव झाला तर राज्य शासनाच्या महसुलात मोठ्या प्रमाणावर घट होईल. त्याचप्रमाणे राज्यशासनाची वित्तीय स्वायत्तता नष्ट होईल.त्यामुळे वरील बाबींचा विचार करता पेट्रोल व डिझेल GST अंतर्गत आणण्यात येऊ नये अशी स्पष्ट भूमिका राज्य शासनाने घेतली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कोरोना काळातील कंत्राटी कर्मचा-यांना कायमस्वरुपी**
**शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत**

**(२६) ३२४६९ (०७-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) श्री. अभिमन्यु पवार (औसा), श्रीजयकुमार गारे (माण), श्री गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोरोनाचा संसर्ग झालेल्या रुग्णांचे प्रमाण जास्त असल्याने कार्यरत असलेल्या आरोग्य यंत्रणेवर जादा ताण आल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियान योजने अंतर्गत आरोग्य विभागात डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ आणि इतर कर्मचारी यांची कंत्राटी स्वरुपात नियुक्ती करण्यांत आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-यांनी कोरोनाच्या संकट काळात जिवावर उदार होऊन उत्तमरीत्या व जबाबदारीने आरोग्य सेवा दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंत्राटी कर्मचा-यांनी त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे अशी मागणी शासनाकडे दिनांक १९ सप्टेंबर २०२१ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात कोरोनाचा संसर्ग ओसरल्यानंतर २१,३७३ कंत्राटी कोव्हीड कर्मचाऱ्यांची माहे, सप्टेंबर, २०२१ पासून नियुक्ती रद्द करण्यांत आली असल्याने ते बेरोजगार झाले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कोरोना काळात उत्तमरीत्या व जबाबदारीने आरोग्य सेवा दिलेल्या कंत्राटी कर्मचा-याना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२५-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) कोविड उपचार केंद्रांवर नियुक्त करण्यात आलेला कर्मचारी वर्ग हा निव्वळ कंत्राटी स्वरुपात तीन महिने किंवा कोविड-१९ साथीचे रुग्ण मोठया प्रमाणात असेपर्यत यापैकी जे आधी घडेल त्या कालावधीपुरता मर्यादित होता. तसे त्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये नमूद करण्यात आलेले होते. कोविड-१९ साथीचे रुग्ण कमी झाल्यानंतर त्यांना आवश्यकतेनुसार कमी करण्यात आले आहे. सदर नियुक्ती तात्पुरती कंत्राटी पध्दतीची असल्याने कायमस्वरुपी सेवेत सामावून घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. राज्य शासनाच्या अखत्यारितील नियमित पदे त्या-त्या पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार भरण्यात येतात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) तालुक्यात अधिकारी गैरहजर असल्यामुळे नागरिकांना धान्य मिळत नसल्याबाबत

**(२७) ३२६४८ (२९-११-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) तालुक्यात मागील दोन महिन्यांपासून रिक्त असलेल्या तालुका पुरवठा अधिकारी या पदावर नियुक्तीचे आदेश येवूनही संबंधीत अधिकारी गैरहजर असल्यामुळे सुमारे १९४ रेशन दुकानांवरील नागरिकांना धान्य मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वाधिक रेशनकार्ड व लाभार्थी असलेल्या रायगड जिल्हयातील पनवेल तालुक्यात १९४ रेशन दुकानांत प्राधान्य व अंत्योदय योजनेद्वारे सुमारे ६८ हजार रेशनकार्डमध्ये २ लाख ७८ हजार नागरिकांची नोंद असून दरमहिन्यांला अंदाजे १५ हजार क्विंटल धान्यांचे वाटप केले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रास्तभाव धान्य दुकानावर नियंत्रण ठेवण्यासाठी व रेशन दुकानांची तपासणी तसेच दरमहा धान्य वाटप व रेशनकार्ड संबंधीत तक्रारींसाठी जबाबदार अधिकारी म्हणून पुरवठा अधिकारी याची महत्त्वाची भूमिका असते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नियुक्तीचे आदेश देवून पुरवठा अधिकारी हजर न झाल्यामुळे नागरिकांना धान्य मिळण्यास अनेक अडचणी निर्माण होत असल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नियुक्ती आदेश देवूनही गैरहजर राहणा-या तालुका पुरवठा अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१०-१२-२०२१) :**१) हे खरे नाही.

(२) रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यामध्ये १९४ रास्तभाव दुकाने कार्यरत आहेत. त्यामधील शिधापत्रिकांची संख्या ६९३८९ आहे. त्यामध्ये प्राधान्य व अंत्योदय योजनांच्या २८१८५३ लाभार्थ्यांची नोंद असून त्यांना पंतप्रधान गरिब कल्याण योजनेच्या अन्नधान्यासह दरमहा अंदाजे २४००० क्विंटल धान्याचे वाटप केले जाते.

(३) हे खरे आहे.

(४) पुरवठा निरीक्षण अधिकारी, पनवेल तालुका हे पद दिनांक ०९.०८.२०२१ पासून बदलीने रिक्त झाल्यामुळे या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि.११.०८.२०२१ पासून अन्य अधिका-यास देण्यात आला होता. रिक्त पदावर नियमित अधिकारी दि.२०.१०.२०२१ पासून रूजू झाले आहेत. सबब, पुरवठा अधिकारी यांचेविरूद्ध कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खारेपाटण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) संभाजीनगर टाकेवाडी नळपाणीपुरवठा योजनेच्या प्रलंबित कामांबाबत

**(२८) ३२६८४ (२९-११-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेपाटण (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) संभाजीनगर टाकेवाडी नळपाणी पुरवठा योजनेस सन २०१७-१८ मध्ये ५८ लाख अंदाजित खर्चास मंजुरी असून सदर नळपाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदत दिनांक ३१ ऑगस्ट, २०१९ पर्यंत देण्यात आलेली असताना अद्यापपर्यंत सदर योजनेचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित ठेकेदार तसेच अधिकाऱ्यांकडून या कामाबाबत दुर्लक्ष झाले असल्यामुळे दिनांक ५ नोव्हेंबर, २०२० पासून गावाला पाणीपुरवठा करणारी नळपाणीपुरवठा योजना बंद ठेवण्याचा इशारा सरपंच ग्रामपंचायत, खारेपाटण यांनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायत कार्यालयाशेजारी उंच आर.सी.सी. मनोरा बांधून बांधण्यात आलेली साठवण टाकी सध्या धोकादायक झाली असून त्या टाकीवर शिडीने वर चढून टाकी साफ करण्यास कर्मचारीसुद्धा घाबरत असून ती कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (१४-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) ग्रामपंचायत कार्यालया शेजारी उंच आर.सी.सी. नादुरूस्त टाकी ग्रामपंचायतीच्या ताब्यात असल्याने टाकी निर्लेखित करणेच्या सुचना खारेपाटण ग्रामपंचायतीला दिलेल्या आहेत. तसेच योजनेतील टाकेवाडीसाठी घ्यावयाच्या अतिरिक्त उद्‌भव विहीरीचे काम वगळता योजनेच्या इतर सर्व उपांगांची कामे पूर्ण करणेत आली असून दिनांक ०२.१२.२०२१ पासून पाणी पुरवठा सुरू करणेत आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना, फ्रंटलाईन वकर्स, शिक्षकांना सरकारकडून वेळेवर मानधन मिळत नसल्याबाबत**

**(२९) ३२९६६ (०५-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना, फ्रंटलाईन वकर्स, शिक्षकांना शासनाकडून वेळेवर मानधन मिळत नसल्याचे दिनांक ०२ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मानधन मिळत नसल्याने अनेक कर्मचारी मानसिक तणावातून आणि आर्थिक विवंचनेतून आत्महत्या करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांना, फ्रंटलाईन वर्कस व शिक्षकांना शासनाकडून त्वरीत मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (२८-०१-२०२२) :** (१) या विभागास अशाप्रकारचे पत्र/ निवेदन प्राप्त झालेले नाही.

(२), (३), (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उजनी (ता.औसा, जि. लातूर) परिसरातील तेरणा नदीच्या पात्रातील गावांसाठी पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन वाहून गेल्याबाबत**

**(३०) ३३०२८ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी (ता.औसा, जि. लातूर) परिसरात दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे तेरणा नदीच्या पात्रातून गावांसाठी पाणीपूरवठा करणारी पाईपलाईन वाहून गेल्यामुळे गावातील पाणीपूरवठा बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गावातील नागरीकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे. तेरणा नदीपात्रापलीकडील विंधन विहीरीद्वारे पाणी पुरवठा होणाऱ्या पाईप लाईन पैकी नदीपात्रातील १८ मीटर पाईप वाहून गेले होते.

(२) होय. अतिवृष्टीतील पूर परिस्थितीचे कालावधीत मौ.उजनी या गावातील विविध विभागातील सार्वजनिक १० विंधन विहीरीद्वारे गावातील नागरिकांना सुरळीत पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच तेरणा नदीपात्रापलीकडील विंधन विहीरीद्वारे पाणी पुरवठा होणारी, पाईप लाईन तात्पुरत्या स्वरुपात जोडण्यात आलेली आहे. गावास पाणी पुरवठा सुरळीत चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात हिंगोली जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागामार्फत**
**निविदा न काढताच कामे पूर्ण झाल्याबाबत**

**(३१) ३३५७४ (०५-०१-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हिंगोली जिल्हा परिषदेच्या लघु सिंचन विभागामार्फत निविदा न काढताच कामे पूर्ण झाल्याची बाब माहे जुलै, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत चौकशी करून संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाकडून उक्त प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, तद्अनुषंगाने दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (२४-०१-२०२२) :** (१) व (२) हे खरे, नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वलांडी (ता.निलंगा, जि लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास**
**ग्रामीण रूग्णालयाचा दर्जा प्राप्त होणेबाबत**

**(३२) ३४०२० (१०-०१-२०२२). श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना संसर्गाचा वाढता प्रादूर्भावामुळे आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याच्या अनुषगांने वलांडी (ता.निलंगा, जि लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास ग्रामिण रूग्णालयाचा दर्जा प्राप्त होण्याचा प्रस्ताव आरोग्य विभागास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (३१-०१-२०२२) :** (१) व (२) प्राथमिक आरोग्य केंद्र,वलांडी ,ता. निलंगा जि.लातूर येथील ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करणेबाबातचा प्रस्ताव उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांचेकडून दि. ०९/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाला होता. तथापि, सदर पस्तावात त्रुटी असल्यामुळे आयुक्त, आरोग्य सेवा कार्यालयाने त्यांचे दि. १४/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर त्रुटींची पूर्तता करणेबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा,लातूर यांना कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**काटीपाटी (जि. अकोला) येथील बॅरेज प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या पस्तावाबाबत**

**(३३) ३४२०२ (०५-०१-२०२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचा शासनाने राज्यपालांच्या सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रमात व केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेत समावेश केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काटीपाटी बॅरेज प्रकल्पास केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून ३३० कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर काटीपाटी बॅरेज प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव उच्चाधिकार समिती कडून मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आला हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास शासन केंव्हा मंजुरी देणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०१-०२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
सदर प्रकल्प हा मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या सिंचन अनुशेष निर्मुलन कार्यक्रमामध्ये समाविष्ट नाही, तथापि केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेत समाविष्ट आहे.
(२) काटीपाटी प्रकल्पासाठी बळीराजा जलसंजीवनी योजनेअंतर्गत दि. ३१.१२.२०२१ पर्यंत रु. २.५६ कोटी निधी खर्च करण्यात आला असून रु. ०.०११५ कोटी इतके केद्रिय अर्थसहाय्य प्राप्त झालेले आहे.
(३) होय.

(४) शासनस्तरावर उपस्थित झालेल्या शे-यांची पुर्तता करून सुधारित प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर सुधारीत प्रशासकीय मान्यतेबाबत कार्यवाही शासनस्तरावर करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**शालेय पोषण आहारा ऐवजी आहाराची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत**

**(३४) ३४५०६ (१७-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यंदाच्या उन्हाळी सुट्टीत शालेय पोषण आहार विद्यार्थ्यांना न देता त्या बदल्यात आहाराची किंमत सुमारे दिडशे रुपये विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने माहे जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास घेण्यात आला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्प रक्कमेसाठी हजारांचे बँक खाते उघडण्यास पालकवर्गात नाराजी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०१-०२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सन २०२१ च्या उन्हाळी सुट्टीसाठी केवळ एक वेळ विशेष कल्याणकारी उपाय म्हणून सर्व पात्र विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेच्या आहार खर्चाच्या रकमेइतके आर्थिक सहाय्य थेट लाभ हस्तांतरण (DBT) व्दारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरण करण्याचे निर्देश केंद्र शासनाने दि.१५/०६/२०२१ रोजीच्या पत्राव्दारे दिलेले आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
(३) केवळ विद्यार्थ्यांच्या बँक खात्याऐवजी विद्यार्थी व पालक यांचे संयुक्त बँक खाते किंवा पालकांचे बँक खात्यावर लाभाची थेट रक्कम हस्तांतरीत करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार रक्कम हस्तांतरित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यात सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांचा व पथदिव्यांचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याबाबत**

**(३५) ३५०१३ (१२-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांच्या १,९७९ वीज जोडण्यांचे ७५ कोटी ४४ लाख व पथदिव्यांच्या ३,८९५ वीज जोडण्यांचे ४६९ कोटी रुपये थकीत असल्याने पाणीपुरवठा योजनांचा व पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने पथदिवे व पाणीपुरवठा योजनांचा वीजपुरवठा सुरळीत राहण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यापूर्वी शासनाने रस्त्यावरील विजेच्या दिव्यांची वीज बिलांची रक्कम भरण्यासाठी १४ व्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतींना १०० टक्के अनुदान मंजूर करुन सदर अनुदान थेट महावितरणाला अदा करण्यात आलेले होते. तद्नंतर ग्रामपंचायतींनी चालु विद्युत देयकांचा भरणा स्वनिधीतून महावितरणकडे करावा असे त्यांच्या दिनांक ०६.०८.२०२१ च्या पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने ताळमेळ घेण्यासाठी उपरोक्त प्रकरणांची शासनाने ग्रामपंचायत निहाय/ग्राहक निहाय विज जोडणी कनेक्शनची मागणी केलेली आहे. त्यानुसार ग्राहक निहाय थकित वीज बिलाची माहिती तयार करण्यात येवून शासनास सादर करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पथदिवे व पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा सुरळीत राहण्याच्यादृष्टीने राज्य शासनामार्फत थकित वीज बिलापोटी महावितरणला देण्यासाठी राज्य शासनाने त्यांचेकडील दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ च्या आदेशान्वये पंचायत समिती/ग्रामपंचायतींना देण्यासाठी जिल्हा स्तरावर निधी वितरीत केलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण वैधानिक विकास महामंडळ स्थापनेसाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याच्या दिलेल्या आश्वासनाबाबत**

**(३६) ३५०२५ (०५-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :**सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकण वैधानिक विकास महामंडळाच्या स्थापनेसाठी महाराष्ट्र विधिमंडळाने केंद्र शासनाकडे पाठवलेल्या ठरावाचा राज्य सरकारकडून पुन्हा पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री, वित्त व नियोजन यांनी प्रश्न क्र. १३७२ दिनांक १७ जुलै, २०२० च्या लेखी उत्तरात दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे आणि त्यास केंद्र शासनाकडून प्रतिसाद मिळाला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी केंद्र शासनाकडून अद्याप कोणताच प्रतिसाद मिळाला नसल्यास राज्य शासनाची भूमिका काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१०-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) कोकण विकास मंडळ स्थापना करणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाकडे विनंती केली आहे. तसेच दिनांक २७ सप्टेंबर, २०१८ व दिनांक ०७ सप्टेंबर, २०१९ च्या पत्रान्वये कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ

स्थापन करण्याकरिता सत्वर निर्णय घेण्याची विनंती केंद्र शासनास केली आहे.

कोकणाकरिता स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याकरिता भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ (२) (क) मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असून सदर बाब केंद्र शासनाच्या अधिकारकक्षेतील आहे.

---

## नाशिक शहरामध्ये आडगाव व जेलरोड येथे नवीन सुसज्ज उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्याबाबत

**(३७) ३५१६३ (१०-०१-२०२२). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता तसेच नाशिक प्रशासकीय विभागातील पाचही जिल्ह्यातील नागरिक आरोग्याच्या उपचारासाठी शहरात येत असल्याने शहरातील शासकीय रुग्णालयातील आरोग्य सेवांवर ताण पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास नाशिक शहरात आडगाव व जेलरोड येथे दोन नवीन सुसज्ज नवीन उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्याबाबत लोकप्रतिनिधीं यांनी दि १६ मे, २०२१ व दि.२१ ऑगस्ट २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक शहरामध्ये आडगाव व जेलरोड येथे नवीन सुसज्ज नवीन उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२८-०१-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

नाशिक शहरामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाचे ६०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व १०० खाटांचे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय कार्यान्वित आहेत.तसेच नाशिक शहरातील आडगांव व जेलरोड हे महानगरपालिका क्षेत्रामध्ये येत असून आडगांव येथे मराठा विद्या प्रसारक मंडळाचे डॉ.व्ही.एन.पवार, वैद्यकीय महाविद्यालय व नाशिक रोड येथे बिटको हॉस्पिटल कार्यान्वित आहे.यांचे मार्फत रुग्णांसाठी आरोग्य सुविधा महानगरपालिका प्रशासनाने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

जिल्हा मुख्यालयी उपजिल्हा रुगणालय निकषामध्ये बसत नाही.मुख्यालयी जिल्हा रुग्णालय स्थापित करण्यांत येतात.त्यानुसार नाशिक जिल्हा मुख्यालयी सार्वजनिक आरोग्य विभागाचे ६०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व १०० खाटांचे विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय कार्यान्वित असून, नाशिक महानगरपालिकांची रुग्णालये कार्यान्वित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बालकांच्या पोषण आहारात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(३८) ३५४३५ (२२-११-२०२१). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषणाचे पुर्णपणे उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यातील शाळा, अंगणवाडी व बालक पोषण केंद्रांमध्ये बालकांसाठी विविध पूरक पोषण आहारांतर्गत धान्याचे मोफत वितरण करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूरक पोषणाचे धान्य हे ५० किलोग्रॅमच्या गोणीमध्ये वितरीत करण्याबाबत संबंधित निविदा ठेकेदारांना सूचना देण्यात येत असतानाही जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील स्वामी विवेकानंद शाळा व श्रमिक विद्यालय येथे संबंधित ठेकेदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या पूरक पोषण आहाराच्या धान्याच्या गोण्यांमध्ये प्रत्येक गोणीमध्ये ५० किलोग्रॅम ऐवजी केवळ २५ / ३० किलोग्रॅम धान्य देण्यात येत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक नगरसेवक यांनी सदरहू गैरप्रकार शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या निदर्शनास संबंधित ठेकेदार व अधिकारी / कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्याचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, त्यानुसार याबाबत दोषी असणारे संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करणेसह भविष्यात अश्या घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड (१०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वस्तू व सेवा करातील उणिवा दूर करण्याबाबत

**(३९) ३५५१४ (०५-०१-२०२२). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वस्तू व सेवा करामुळे आर्थिक स्त्रोताचे विकेंद्रीकरण होऊन न्याय वितरण होत नसल्याने वस्तू व सेवा करातील उणिवा दूर करण्याची मागणी सतत शासनाने केंद्र शासनाकडे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वस्तू व सेवा करातील नवी सुधारित करपद्धती येईपर्यंत जुनीच कर पद्धती राबवण्याचीही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वस्तू व सेवा कर उत्पन्नातून राज्याला २५ टक्के वाटा मिळावा अशी मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केली आहे, ही हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वस्तू व सेवा कर उत्पन्नातील राज्याला मिळणारा कोट्यावधी रुपयांचा निधी केंद्र शासन राज्याला वेळेवर देत नाही हे खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (०४-०२-२०२२) :** (१) वस्तू व सेवा करामुळे आर्थिक स्त्रोताचे विकेंद्रीकरण होऊन न्याय वितरण होत नसल्याने वस्तू व सेवा करातील उणिवा दूर करण्याची मागणी सतत शासनाने केंद्र शासनाकडे केली आहे हे खरे नाही.
(२) वस्तू व सेवा करातील नवी सुधारित करपद्धती येईपर्यंत जुनीच कर पद्धती राबविण्याचीही मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली नाही.
(३) वस्तू व सेवा कर उत्पन्नातून राज्याला २५ टक्के वाटा मिळावा अशी मागणी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली नाही.
(४) वस्तू व सेवा कर उत्पन्नातील राज्याला मिळणारा कोट्यावधी रुपयांची नुकसान भरपाई (निधी) केंद्र शासन राज्याला वेळेवर देत नाही हे खरे आहे. वस्तू व सेवाकराच्या अंमलबजावणीमुळे राज्यशासनास होणाऱ्या महसूल हानीकरिता केंद्रशासनाकडून मिळणारी वस्तू व सेवाकराची भरपाई (दि.१३.०१.२०२२ रोजीची स्थिती) रु.२८,३६५ कोटी येणे बाकी आहे.
(५) लागू नाही.

---

## तळेगाव ढमढेरे (जि.पूणे) येथील आरोग्य केंद्रात सर्पदंश झालेल्या मुलीचा उपचाराअभावी मृत्यू झाल्या बाबत

**(४०) ३५५८६ (१०-०१-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळेगाव ढमढेरे (जि.पूणे) येथील आरोग्य केंद्रात सर्पदंश झालेल्या मुलीचा योग्य उपचाराअभावी मृत्यू झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्प दंश झालेली आठ वर्षाची मुलीला प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी आणले असता तेथे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याने तिच्यावर योग्य उपचार झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यामध्ये काय निष्पन्न झाले,
(४) असल्यास, त्यानुसार दोषी असण्या-या संबधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (३१-०१-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, तळेगाव ढमढेरे, ता.शिरुर जि.पुणे येथे unknown bite च्या रुग्णाला खाजगी वाहनाने प्राथमिक आरोग्य केद्रात उपचार करण्यासाठी दाखल केले होते. सदर रुग्णास कर्तव्यावर असणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेविका यांनी प्राथमिक उपचार केले व पुढील उपचार करण्यासाठी १०८ रुग्णवाहिकेद्वारे ससून रुग्णालय, पुणे येथे संदर्भित करण्यात आले होते.

(३) तालुका आरोग्य अधिकारी, यांचेमार्फत चौकशी करण्यात आली, चौकशी अंती प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर कोणताही विलंब झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेगाव तालुक्यातील (जि. बुलढाणा) येथे १०० हेक्टर पर्यंतच्या सिंचन क्षमतेच्या ४ व्दारयुक्त सिमेंट बंधारे बंधाऱ्याबाबत**

**(४१) ३५६८१ (०५-०१-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगाव तालुक्यातील (जि. बुलढाणा) ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या ४ व्दारयुक्त सिमेंट बंधारे योजनांना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ यांनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्रशासकीय मान्यता दिली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामांसाठी रुपये ११ कोटी ४० लक्ष ९८ हजार ५५० इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामे रद्द करण्याचे आदेश वरिष्ठ अधिकारी, जलसंधारण विभग, मंत्रालय यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांनी त्यांच्या स्वाक्षरीने दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास पत्रातील प्र.क्र./५६१४/१४४ दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास ही प्रशासकीय मान्यता रद्द केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सिमेंट बंधारे योजना रद्द करण्याची कारणे काय आहेत व सदरहू योजना पुन्हा कार्यान्वित करण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंकरराव गडाख (२४-०१-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम निधीच्या उपलब्धतेवर झाल्यामूळे आर्थिक दायित्व मर्यादित करण्याकरिता काही योजनांच्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आल्या आहेत.

नविन आर्थिक दायित्व स्विकारण्या संदर्भात शासन धोरण आणि निधीची उपलब्धता यानुसार योग्य वेळी याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

---

**दौंड तालुक्यातील (जि. पुणे) जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनांना मान्यता मिळण्याबाबत**

**(४२) ३५७७८ (१२-०१-२०२२). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीऐंदी, लडकतवाडी, खामगाव, पाटेठाण, गलांडवाडी, भांडगाव, स्वामी चिंचोली, कौठडी, मलठण, लिंगाळी, खोपोडी (ता.दौंड, जि.पुणे) या गावातील पाणी पुरवठा योजनांना जलजीवन योजनेंतर्गत मान्यता मिळावी अशी मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील DPR बनविण्याचे काम सुरु असून आवश्यक कागदपत्रे व इतर माहिती बाबत ग्रामपंचायतीला कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गावातील पाणी योजनांना मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. गुलाबराव पाटील (२५-०१-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील लिंगाळी, भांडगाव, पाटेठाण या गावाचे जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत मागणी पत्र व ठराव प्राप्त आहेत. उर्वरित बोरीऐंदी, लडकतवाडी, खामगाव, गलांडवाडी, स्वामीचिंचोली, कौठडी, मलठण, खोपोडी या ग्रामपंचायतला उप अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या प्रत्यक्ष भेटी दरम्यान ग्रामपंचायतने जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत योजना मिळावी अशी तोंडी मागणी केली आहे. त्यानुसार गावातील पाणी पुरवठा योजनांना जलजीवन आराखड्यामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे.

(२) होय हे खरे आहे. सदर गावांपैकी ३ गावांना लिंगाळी, भांडगाव, पाटेठाण यांना जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष यांचे अध्यक्ष स्तरावर प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित गावांचे DPR तयार करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर चालू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील अकृषिक विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण विहित करण्यासाठी समितीच्या शिफारशींना मान्यता देण्याबाबत**

**(४३) ३५८१९ (१२-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषिक विद्यापीठांतर्गत होणाऱ्या उपकेंद्रासाठी धोरण विहीत करण्यासाठी माजी कुलगुरु डॉ. योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून सदर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींना शासनाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०१-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम २०१६ मधील कलम ५(१०) नुसार उपपरिसर/उपकेंद्र स्थापन करण्यासंदर्भात विद्यापीठाला अधिकार आहेत. त्याप्रमाणे व्यवस्थापन परिषद व इतर विद्यापीठ प्राधिकरणांची मान्यता घेऊन उपकेंद्र स्थापन करण्याचे प्रस्ताव शासनास प्राप्त होतात. सदर उपकेंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावाना काही अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येते. त्याप्रमाणे पुणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे नाशिक व अहमदनगर येथे उपकेंद्र स्थापन करण्यास दि.२२.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे परभणी येथे उपकेंद्र स्थापन करण्यासंदर्भात दि.०५.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी येथील कामवारी नदीचे पाणी प्रदुषित होत असल्याबाबत

**(४४) ३५८४५ (२९-११-२०२१). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहराच्या प्रवेशद्वारावर असलेली कामवारी नदीचे उगमापासून ते संगमापर्यंत एकूण ३४ कि.मी. क्षेत्रफळ असून प्रदूषणामुळे तिचे नाल्यात रूपांतर झाले असल्याने नदी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे भिवंडीतील नागरिकांना कामवारी नदीतील त्यांच्या हक्काच्या पाण्याच्या स्त्रोताचा लाभ होत नाही तसेच पर्यावरणाचा ऱ्हास होऊन जल प्रदूषणाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामवारी नदीतील प्रदूषित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मलनि:सारण प्रकल्प उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. आदित्य ठाकरे (१७-१२-२०२१) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) भिवंडी शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतंर्गत भुयारी गटार योजना टप्पा - २ अंतर्गत भिवंडी शहरात ९९ द.ल.लि. क्षमतेचे ४ मलशुध्दीकरण बांधणे व १५७ कि.मी. लांबीच्या मलवाहिन्या अंथरण्याच्या प्रकल्पाचे काम भिवंडी - निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातील रुग्णालयात वेंटिलिटरचा अभाव असल्याबत**

**(४५) ३६१४३ (१०-०१-२०२२). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील रुग्णालयात वेंटिलिटर वापरात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, वेंटिलेटर सुविधा अभावी माहे मार्च २०२१ पर्यंत किती रुग्णांचे मृत्यू झाले आहेत,

(३) असल्यास, यास जबाबदार असलेल्या संबधित उपसंचालक, सिव्हिल सर्जन यांच्या वर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२७-०१-२०२२) :** (१) नाही,हे खरे नाही.

(२) मार्च, २०२१ अखेर व्हेंटीलेटर सुविधे अभावी एकाही रुग्णाचा मृत्यू झाल्याचा अहवाल प्राप्त नाही.

(३) आणि (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मार्की बु. (ता. झरी झामणी, जि.यवतमाळ) गावातील**
**पाण्याच्या टाकीच्या बांधकामाबाबत**

**(४६) ३६१७८ (१२-०१-२०२२). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मार्की बु. (ता. झरी झामणी, जि.यवतमाळ) येथे सन २००५ ते २०१० मध्ये पाणीपुरवठा विभागाकडून ग्रामीण पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्याकरीता लाखो रुपयांचा निधी देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरीकांकडील पाणी कर, घर कर व इतर कराच्या माध्यमातून शासन सामान्यांच्या हितासाठी वेगवेगळया योजना अंमलात आणून नागरिकांना आवश्यक असणाऱ्या सोईसुविधा पुरविते परंतु मागील १२ वर्षापासून मौजे मार्की बु. येथील पाण्याच्या टाकीचे काम अपूर्ण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम पाणीपुरवठा समितीमधील पदाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी एकत्रितरित्या करणे आवश्यक असून लाखो रुपये निधी देऊनही अद्याप काम प्रलंबित असल्याने याकामात गैरव्यवहार झाल्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०९-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे, योजनेच्या पाण्याच्या उंच टाकीचे काम ९०% पूर्ण केले असून योजनेची इतर उपांगे पूर्ण करून गावाला नियमित पाणी पुरवठा सुरू आहे. पाण्याच्या टाकीचे उर्वरित १०% काम १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.
(३) नाही, हे खरे नाही. ग्राम आरोग्य पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीस शासन निधी, लोकवर्गणी व व्याज असे एकूण रु. १५,९५,६३४/- उपलब्ध झाला होता. प्रत्यक्ष करण्यात आलेले कामाचे मुल्यांकन रु १६,०७,३८८/- असे आहे. त्यामुळे सदर योजनेच्या कामात कुठलाही गैरव्यवहार झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) सदर योजनेच्या कामास प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी उप विभागीय अभियंता, वणी यांनी केली असून अहवाल प्राप्त आहे. त्यानुसार कामात गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे विषयांकित प्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता भासली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बाभूळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात शासकीय गोदामातील धान्य साठयामध्ये अफरातफर झाल्याबाबत**

**(४७) ३६२०८ (२९-११-२०२१). श्री.मदन येरावार (यवतमाळ), श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाभूळगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात शासकीय धान्य गोदामात उपायुक्त यांनी दि. ७ व ८ जुलै २०२१ रोजी वा त्यासुमारास तपासणी केली असता धान्यसाठयामध्ये अफरातफर झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरीष्ठ अधिकाऱ्याच्या तपासणीला दोन महिन्यांचा कालावधी होवून सुध्दा स्थानिक यंत्रणेने नोंदवहीत चुकीचा शेरा नोंदविला असून पुरवठा उपायुक्तांनी सात दिवसापूर्वी तपासणी केलेल्या गोदामातील धान्य साठयात त्रुटया आढळून आल्या असतांना स्थानिक तहसिलदारांना मात्र अभिलेखामधील नोंदी निरंक दिसत असल्याने त्यांच्या कार्यप्रणालीवर संशय व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासकीय गोदामात वरिष्ठ अधिकाऱ्यांची लेखी परवानगी घेण्यापूर्वीच अन्य योजनेत धान्यसाठा वापरला असल्याचे उपायुक्तांच्या तपासात सिध्द झाल्याने दि. २४ सप्टेंबर २००४ च्या शासन परिपत्रकानुसार एका योजनेतील धान्य दुसऱ्या योजनेत वाटप केल्याने सदर बाब गंभीर असून याप्रकरणी कर्तव्यात अनियमितता केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी १ लाख ७४ हजार ५०७ रुपयांचा ५८ क्विंटल गहू तर २ लाख ५ हजार ९०४ रुपयांचा ४८ क्विंटल तांदूळसाठयात अफरातफर आढळून आल्याने यांस जबाबदार अधिकारी-कर्मचाऱ्यांची चौकशी होऊन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१३-१२-२०२१) :** (१) उपायुक्त (पुरवठा) अमरावती विभाग व त्यांचे कार्यालयीन अधिकारी यांनी दि.०७ व ०८ जुलै, २०२१ रोजी बाभूळगाव जि.यवतमाळ येथील गोदामाची तपासणी केली असून सदर तपासणीमध्ये गव्हाच्या चाचणी वजनात ५८ क्विंटल व तांदळाच्या चाचणी वजनात ४९ क्विंटल इतकी तूट आढळून आली आहे.

(२) तहसिलदार, बाभूळगाव यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली असून त्यानुसार तहसिलदार, बाभूळगाव यांनी खुलासा सादर केला आहे. त्यानुसार दि.३०.०६.२०२१ रोजी पर्यंत केलेल्या त्रैमासिक तपासणीत कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नसल्याचे कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

मौखिक आदेशान्वये धान्याचे वाटप वळता करुन वाटप ज्या महिन्याचे त्या महिन्यात केले आहे. त्यानंतर प्रत्येक महिन्यात मोफत धान्य वाटप करण्यास धान्य शिल्लक नसल्यामुळे गोदामपाल यांनी विनापरवाना धान्य दुसऱ्या योजनेत वळते केले आहे. नंतर ज्या योजनेतून धान्य घेतले होते त्या योजनेत वळती करण्यात आले आहे.

(४) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे दि.२४.०९.२०२१ चे आदेशान्वये गोदामपाल श्री.दिनेश व्ही. माहुरे यांचेवर त्रुटीची जबाबदारी निश्चित करुन त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच दि. २४.०९.२०२१ चे आदेशान्वये रु.३,८०,४४७.८०/- इतक्या वसुलीचे आदेश पारीत करण्यात आले असून त्यानुसार वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयाचे पुरवठा अधिकारी शासकीय धान्याचा अपहार करीत असल्याबाबत**

**(४८) ३६४२४ (२९-११-२०२१). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्याचे पुरवठा अधिकारी श्री.बोडके यांनी नियमांचे उल्लंघन करून गैरव्यवहार केला असल्याने त्यांचे विरूध्द गैरव्यवहाराच्या अनेक तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.बोडके हे रायगड जिल्ह्यात येणाऱ्या शासकीय धान्याचा अपहार करून सदर धान्याचा काळाबाजार व परराज्यात विक्री करीत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.बोडके व त्यांच्या कुटुंबियांच्या मालमत्तेची / संपत्तीची चौकशी करून सदर संपत्ती शासनाकडे जमा करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याबाबत लाईफ इन लाईट या सेवाभावी संस्थेने मा.अन्न नागरी पुरवठा मंत्री, सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग यांना माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान पत्राद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणी जिल्हाधिकारी रायगड यांनी चौकशी करून १० दिवसात अहवाल सादर करण्याबाबत केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडे दिनांक ९ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास सुनावणी आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू सुनावणीच्या अनुषंगाने चौकशी अहवाल जिल्हाधिकारी रायगड व शासनास सादर करण्यात आला आहे काय, सदरहू अहवालात काय नमूद करण्यात आले व त्याचा तपशील काय आहे व त्यानुषंगाने श्री.बोडके यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ (१०-१२-२०२१) :** (१), (२), व (३) हे खरे आहे.

लाईफ इन लाईट या संस्थेकडून ३०.०३.२०२१ च्या पत्रान्वये शासनाकडे तक्रार प्राप्त झाली होती. याप्रकरणी, जिल्हाधिकारी, रायगड यांनी केलेल्या चौकशीमध्ये तक्रारीत काही तथ्य आढळून आले नाही.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

दि.०९.०८.२०२१ रोजी अपर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे आयोजित सुनावणीसाठी संबंधीत लाईफ इन लाईट या सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व त्यांचे वकील सुनावणीस उपस्थित होते. सुनावणी दरम्यान वा त्यानंतर तक्रारदार व त्यांचे वकील हे तक्रारीतील मुद्द्यांच्या अनुषंगाने कोणतेही ठोस पुरावे सादर करू शकले नाहीत. सदर प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी हे दोषी आढळून न आल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोंडवाना विद्यापीठाकरिता खरेदी केलेल्या खाजगी जागेची भूसंपादन प्रक्रिया कार्यान्वित करणेबाबत

**(४९) ३६४२५ (१२-०१-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंडवाना विद्यापीठाने मौजा अडपल्ली गोगाव (ता.जि. गडचिरोली) येथील जमीन खरेदी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीन खरेदी केलेल्या काही शेतकऱ्यांना रक्कम दिली गेली तर काहींना अजूनपर्यंत रक्कम दिली गेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेत जमिनीच्या विक्रीतून पैसे येत असल्याने शेतकऱ्यांनी पुढील नियोजन करून आपल्या मुलामुलींचे विवाह, घर बांधकाम व इतर कामाचे नियोजन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जमीनीची रक्कम शेतकऱ्यांना मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत (२७-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली विद्यापीठासाठी मौजा, अडपल्ली ता. जि. गडचिरोली येथील ७८.१७ हे आर खाजगी जमीन अधिग्रहित करण्याचे नियोजित असून, आजतायागत उपविभागीय अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, गडचिरोली यांचेकडून ९ भूधारकांची एकूण १४.१५ हे.आर जमीन अधिग्रहित करण्यात आली आहे. सदर जमीनीचे खरेदी खत तयार करण्यात आले असून, जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेली मोबदला रक्कम संबंधित भूधारकांना त्याच्या बॅक खात्यामध्ये RTGS द्वारे जमा करुन दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदी खत करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तालुका केज (जि. बीड) या विधानसभा मतदार संघातील तलावांच्या दुरुस्ती बाबत

**(५०) ३६४९५ (२५-११-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तालुका केज (जि. बीड) या विधानसभा मतदार संघातील १) लिंबाचीवाडी, साठवण तलाव क्र.०१, २) लिंबाचीवाडी, साठवण तलाव क्र.०२, ३) देठेवाडी, साठवण तलाव ४) कासारी, लघु प्रकल्प ५) वाघेबाबुळगाव, मध्यम प्रकल्प ६) कारंजा, लघु प्रकल्प ७) डिघोळअंबा, लघु प्रकल्प/साठवण तलाव सदर प्रकल्प हे ग्रामीण भागात असून सिंचनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची आहेत त्यामुळे सदर तलावांची दुरुस्ती करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सदय:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (०८-०२-२०२२) :** (१) होय
(२) लिंबाची वाडी सा.त.क्र.१, लिंबाची वाडी सा.त.क्र.२, देठेवाडी सा.त. कासारी ल.पा. , कारंजा व डिघोळ ल.पा. या कामांचे विशेष दुरुस्ती अंतर्गत अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
तसेच वाघेबाभुळगाव मध्यम प्रकल्पाच्या विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रस्तावित अंदाजपत्रकाबाबत शासन स्तरावरुन उपस्थित त्रुटींची पुर्तता क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.